Adda247

GET IT ON Google Play

# MPSC Group C Mains Question Paper 1 Marathi 5 April 2026

2025

X21

| BOOKLET NO. |
|---|
| 102267 |

## मराठी भाषा (अर्हताकारी पेपर)

पेपर – १

एकूण कालावधी : ३ तास

एकूण गुण : ३००

माध्यम : मराठी

प्रश्नपत्रिकेचे स्वरुप : पारंपारिक/वर्णनात्मक

### प्रश्नपत्रिकेसंबंधी विशेष सूचना

प्रश्नांची उत्तरे लिहिण्यापूर्वी खालील सूचना काळजीपूर्वक वाचा.

१. सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.

२. प्रश्नांचे गुण त्या त्या प्रश्नासमोर/उपप्रश्नासमोर दिलेले आहेत.

३. जेथे पर्याय दिलेले असतील तेथे सोडविलेल्या पर्यायांचे केवळ आवश्यक संख्येइतकेच अनुक्रमाने प्रथम प्रतिसादांचे मूल्यांकन केले जाईल. एखादे उत्तर काट मारल्याशिवाय अंशत: सोडविलेले असल्यास ते मोजण्यात येईल. अतिरिक्त प्रतिसादांचे मूल्यांकन केले जाणार नाही आणि त्याकडे दुर्लक्ष केले जाईल.

४. उमेदवारांनी प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्रित सोडविणे अपेक्षित आहे. जर एखाद्या प्रश्नाचा उपप्रश्न इतरत्र सोडविल्यास, (काही पृष्ठ सोडल्यानंतर किंवा दुसऱ्या इतर प्रश्नाचा प्रयत्न केल्यानंतर) अशा प्रकरणी नंतरचे उपप्रश्न मूल्यांकनासाठी दुर्लक्षित केले जाईल.

५. प्रश्नामध्ये वेगळा निर्देश केलेला नसेल तर प्रश्नाची उत्तरे मराठीत (देवनागरी लिपिमध्ये) लिहावयाची आहेत.

६. जेथे जेथे शब्दसंख्येची मर्यादा प्रश्नामध्ये सांगितलेली असेल, तेथे तेथे तिचे पालन केलेच पाहिजे. सांगितलेल्या शब्दसंख्येपेक्षा जास्त अथवा कमी शब्दात उत्तर लिहिलेले असल्यास गुण कमी केले जातील.

७. उत्तर पुस्तिकेतील कोणतेही पृष्ठ कोरे सोडल्यास त्यावर स्पष्टपणे काट मारावी.

Adda247
Test Prime
ALL EXAMS, ONE SUBSCRIPTION

1,00,000+
Mock Tests

Personalised
Report Card

Unlimited
Re-Attempt

600+
Exam Covered

25,000+ Previous
Year Papers

500%
Refund

IBPS

NABARD

INDIAN RAILWAYS

ATTEMPT FREE MOCK NOW

Adda247
GET IT ON Google Play



प्र१. खालील चार पैकी कोणत्याही एका विषयावर ६०० शब्दांत निबंध लिहा. १००

१) AI-कृत्रिम बुद्धिमत्तेचे फायदे तोटे.
२) सोशल मिडिया आणि तरुणांसमोरील आव्हाने.
३) जागतिक तापमानवाढ व विकास : एक व्यस्ततेचे नाते.
४) त्रिभाषासूत्र : माझे विचार.

प्र२. खालील उतारा वाचून उताऱ्याच्या शेवटी दिलेल्या पाच प्रश्नांची उत्तरे सुस्पष्ट योग्य व संक्षिप्त भाषेत लिहा. ६०

मार्क्स व मानसिक संस्कृतीची चिरंतन मूल्ये यांची चर्चा करताना आर्थिक इतिहास व मानसिक इतिहास हे एकमेकांत गुंतलेले असले तरी त्यांचे वेगळेपण (पृथकत्व) मान्य करावेच लागते असे मत तर्कतीर्थांनी व्यक्त केले आहे. जाणीव व जीवन यांची मानवी व्यवहारात विभक्तता दाखविता येत नाही. नीती, धर्म, कायदा, कला, विज्ञान व तत्त्वज्ञान या जाणिवेच्या स्वरूपांना आर्थिक व्यवहारापेक्षा दुय्यम व गौण समजून व आर्थिक व्यवहारास मूलभूत सत्य मानून मार्क्सने इतिहासाचे रहस्य सांगण्याचा प्रयत्न केला. जाणिवेच्या वरील स्वरूपांना आर्थिक शक्तीशी सापेक्षपणाने बांधून टाकले. सर्व जीवनमूल्ये त्या त्या आर्थिक युगापुरतीच खरी होत, युग बदलले की ती बदलतात, शाश्वत वा चिरस्थायी मूल्ये हा केवळ आभास आहे असे मार्क्सवाद सांगतो. तर्कतीर्थांच्या मते सर्वच मूल्ये अर्थसापेक्ष असतात हे विधान अतिव्याप्तिदुष्ट आहे. सृष्टीच्या व मनुष्यसमाजाच्या इतिहासात त्या त्या कालाने मर्यादित किंवा अनेक युगे स्थिर राहणारी अशी मूल्ये पदार्थ, जाती, आकार वा गुण विशिष्ट कालखंडातील अनुकूल परिस्थितीमुळे निर्माण होतात. नंतर उत्पन्न होणाऱ्या कालखंडात त्यांची परंपरा चालू राहाते. तर्कतीर्थांच्या मते प्रतिमा, सूक्ष्म अनुभूती आणि विश्वचिंतन यांच्या संगमाने विशाल कला प्राचीन धर्मयुगाने जन्मास घातली ती त्या आर्थिक युगांना उल्लंघूनही आज तितकीच सतेज व रमणीय राहिली आहे. मनुष्य हा एकसमयावच्छेदेकरून तिन्ही कालात राहणारा व रमणारा प्राणी आहे. त्या त्या परिस्थितीत पूर्णता पावलेली रूपे व आकार दीर्घकालपर्यंत रमणीय राहतात. दूरचा देश, लांबचा काल, भिन्न व्यक्ती व स्वत:च्या परिस्थितीपेक्षा अन्य परिस्थिती यांच्याशी तन्मय होऊन व कलानिर्मिती व कलास्वाद निर्माण होऊ शकतो.

Adda247

GET IT ON Google Play



सत्ये चिरंजीव असतात या भरवशावरच खरोखर शास्त्रांची व कलांची प्रगती होऊ शकते. युगे बदलली तरी सत्ये माणसाला प्रगतीचे आश्वासन देत माणसाची साथ करीत असतात. त्यांची पारख मात्र नव्या नव्या अनुभवांनी सारखी करावी लागते. सामाजिक युग बदलले म्हणजे नवे अनुभव व नवी तत्त्वे प्राप्त होऊ लागतात. त्यांच्या योगाने परंपरागत संस्कृतीचे पुन्हा संशोधन करण्यास आवश्यक अशा साधनांचा लाभ होतो. परंतु युग बदलले म्हणून किंवा युग बदलावे म्हणून परंपरेचा संपूर्ण त्याग करणे यात मोठा धोका आहे.

कोणत्याही सांस्कृतिक मूल्यांची तपासणी करताना त्या त्या विषयांचे तर्कशास्त्र वापरले पाहिजे असे मत तर्कतीर्थांनी व्यक्त केले आहे. या संदर्भात त्यांनी तीन महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. एक म्हणजे भांडवलदारी हितसंबंधाचा दोष मनोविकृती, न्यूनगंड इत्यादी गूढ कारणे दाखवून कोणत्याही मूल्याचा अधिक्षेप करणे फार सोपे आहे. परंतु त्यामुळे खरे मूल्यमापन होऊ शकत नाही. वर्गस्वार्थ किंवा मनोविकृती ज्याच्या ठिकाणी असते त्याला त्याची बाधा प्रतिक्षणी होतेच असे नसते. दुसरे असे की, कोणतेही विधान वर्गस्वार्थमूलक, मनोविकृतिमूलक किंवा सामाजिक परंपरेच्या अभिमानाने केलेले आहे असे सिद्ध झाले तरी ते त्यामुळे चूक आहे असे नक्की म्हणता येत नाही. तिसरे असे की, वर्गाहंकाराची भाषा, मनोगंडाची पीडा अथवा सामाजिक परंपरेच्या अभिनिवेशाची व्यथा यांची तर्कशास्त्रे दुधारी शस्त्रासारखी उभयघातक आहेत, कारण जो ती शस्त्रे वापरतो, त्याच्यातही वर्गाहंकार, मनोगंड व सामाजिक परंपरेचा दोष दाखविणे सुलभ आहे.

१) मूल्ये ही शाश्वत किंवा चिरस्थाई नसतात असे मार्क्स यांनी का म्हटले आहे ?

२) प्राचीन धर्म युगाने विशाल कला कोणत्या तत्त्वांनी जन्मास घातली ?

३) युग बदलले म्हणून परंपरेचा त्याग करण्यात कोणता धोका आहे ?

४) कलास्वादाच्या आणि कलानिर्मितीसाठी कोणत्या गोष्टी आवश्यक असतात ?

५) वर्ग अहंकाराची भाषा व मनोगंडाची पीडा का घातक असते ?

Adda247

GET IT ON Google Play



**प्र३.** खालील उताऱ्याचा **एकतृतीयांश** शब्दांत सारांश लिहा. ६०

नवविचाराचा व भारतीय प्रबोधनाचा पहिला प्रेषित पूर्वेस बंगाल्यात १८ व्या शतकाच्या अखेरीस उदयास आला. तो म्हणजे राजा राममोहन रॉय हे होत. कारण बंगाल्यात आधुनिक शिक्षणाचा पाया महाराष्ट्रापेक्षा सुमारे पाऊणशे वर्षे अगोदर घातला गेला होता. महाराष्ट्रात १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात आधुनिक जीवनदृष्टी देणारे प्रबोधनाचे दोन मोठे उद्गाते पुढे आले. ते म्हणजे लोकहितवादी गोपाळराव हरी देशमुख व जोतिबा फुले हे होत. या वेळी हिंदी मनुष्याचा परंपरागत जीवनक्रम हा संपूर्णपणे सनातन रूढींच्या बंधनात बंदिस्त होता. धार्मिक आणि सामाजिक या दोन कल्पनांत भेद दाखविणारी सीमारेषा सापडत नव्हती. जन्मापासून मरणापर्यंतचे महत्त्वाचे व्यवहार धर्म–रूढींच्या मर्यादेतच बद्ध होते. या सकाळपासून त्या सकाळपर्यंतचे कार्यक्रमही धर्मग्रंथांनी व परंपरागत रूढींनी ठरवून दिलेलेच असत. स्नान, पान, भोजन, उपजीविकेचे व्यवसाय, विवाहपद्धती, समाजातील भिन्न भिन्न उच्चनीच स्तरांवरील वा समान स्तरांवरील जातिजमातींचे आचारविचार, विवाहपद्धती, उपासनापद्धती, अंत्यक्रिया इत्यादी सर्व मानवी क्रिया सनातन रूढीने डोळ्यावर ढापण लावलेल्या घाण्याच्या बैलाप्रमाणे एकाच चक्रात चालत असत. भक्ष्याभक्ष्य, पेयापेय, स्पृश्यास्पृश्य इत्यादी निर्बंध विवेक व विचार न करता परंपरेप्रमाणे चालत असत. कोणाबरोबर जेवावे व काय जेवावे, झोपताना डोके कोणीकडे करावे व पाय कोणत्या दिशेस असावेत, प्रवास केव्हा करावा, कोणत्या समयी व कोणत्या दिशेस प्रवासास निघावे किंवा निघू नये, हजामत कोणत्या वारी व तिथीस वर्ज्य वा विहित इत्यादी गोष्टी धर्म सांगत असे. जांभई, शिंक, इत्यादी स्वाभाविक क्रियांच्या बाबतीतही धर्माने सांगितलेले आचार पाळत असत. प्रत्येक जातीचे, उपजातीचे व कुळांचे आचार ठरलेले असत. बारीकसारीक रूढींचा भंग होऊ नये म्हणून पितर, देव, यक्ष, राक्षस, पिशाच सर्व ठिकाणी बंदोबस्ताकरिता हजर असत. प्रत्येक महिन्याचे ऋतूंचे व काही तिथ्यांचे वा पक्षांचे निरनिराळे आचार आणि व्रते पाळावी लागत. नवस, व्रते, उद्यापने, श्राद्ध, तीर्थोत्सव, यात्रा यांची महती अपूर्व असे. घरात कोणी आजारी पडले, नातेवाइकांवर वा आपणावर काही आपत्ती आली, आपले जनावर अकस्मात मेले, धंद्यात अपयश आले, गृहदाह झाला, इमारत पडली, रोगाची साथ आली, अवर्षण पडले, अतिवृष्टी झाली, तर व्रतभंग, आचारातील घोटाळा, जातिभेदविषयक नियमांच्या पालनातील प्रमाद, विटाळ, चांडाळ इत्यादी कारणांनी देवता, पितर इत्यादिकांचा प्रकोप झाला, असे मानून शांती करीत. त्या वेळचा हिंदु माणूस चोवीस तास व बारा महिने देवता, पितर, राक्षस, भुते, पिशाच्चे इत्यादिकांच्या कडक पहाऱ्यात

Adda247
GET IT ON Google Play



सहत असे. जादूटोण्याची त्याला सारखी भीती असे. घर, विहीर, दरवाजा, चूल, भिंती, आडे, ओसाड जागा, नदी, तलाव, वृक्ष, शेताचा बांध, पर्वत, आकाश व पाताळ यात दाही दिशांस, तीनही काळ या अदृश्य शक्तीचा भरणा व प्रताप त्या माणसास दिसत असे. त्याचे मन या अलौकिक शक्तीच्या भयाने पूर्णपणे व्यापलेले होते. कुलाचार, जात्याचार, देवतांसंबंधी कर्तव्ये यासंबंधी अनेक प्रमाद घडत असत व त्याकरिता प्रायश्चित्त व दंड भोगण्यास तो तयार असे. राजाचे, गावचे, जमातीचे व कुळाचे आधिपत्य व जुलूम मानण्यास व सहन करण्यास तो तयार असे. त्यांचा अंमल त्याच्या मनावर जितका होता त्यापेक्षा या काल्पनिक, स्वप्नमय व भ्रांतिकृत शक्तींचा अधिक असे. तो त्या भुताटकीच्या विश्वात जगत असे.

प्र४. खालील उताऱ्याचे **इंग्रजीत** भाषांतर करा. २०

संगणक संवाद म्हणजे संगणकाच्या माध्यमातून केला जाणारा संवाद किंवा संप्रेषण व्यवहार होय. जगभरात सर्वाधिक संपर्क संगणकाच्या माध्यमातून होतो त्यामुळे हे माध्यम खूप लोकप्रिय आणि अत्यावश्यक बनले आहे. या माध्यमाने प्रभावी संवाद साधून स्वत:चा विकास साधता येतो. आज संगणकाचा संवादासाठी कौशल्याने वापर केला जातो. अलीकडच्या काही वर्षांमध्ये इंटरनेटची सुविधा सर्वदूर पोहोचली असल्याने आणि प्रत्येकाच्या हातात मोबाईल आल्याने हा संवाद संगणकावरून मोबाईलवर आला आहे. मोबाईल ही केवळ संवादासाठी निर्माण झालेली वस्तू आहे. परंतु आज मोबाईलने संगणकाची जागा घेतली आहे. माणूस सामाजिक प्राणी असल्याने संवाद ही त्याची सर्वात महत्त्वाची गरज आहे. तो अनेक गोष्टींसाठी उत्तरावर अवलंबून असतो. म्हणूनच मानवाने समूह जीवन स्वीकारलेले आहे, मानवाची ही संवादाची गरज पूर्ण करण्यासाठी संगणकाचा विविध पद्धतीने वापर होतो. आज तंत्रज्ञानामध्ये सर्वाधिक झपाट्याने विकास माहिती तंत्रज्ञानाचा होत आहे. जगभर निर्माण झालेले इंटरनेटचे जाळे लाखोंच्या संख्येत असलेल्या वेबसाईट या प्रत्येक वेबसाईटवर संवादासाठी उपयोजनात येणारे विविध पर्याय पाहता संवादाची गरज ध्यानात येते. इंटरनेटच्या माध्यमातून माहितीचे वहन मोठ्या प्रमाणात सुरू झाले आहे. गुगल सारखे सर्च इंजिन आपल्याला अचूक माहिती पोहोचवते. माहितीच्या अफाट सागराकडे घेऊन जाते. विकिपीडिया सारखे मुक्त ज्ञानकोश तुम्हाला हवी असलेली माहिती देण्याचे प्रयत्न करतात. हा ज्ञानकोश जगातील महत्त्वाच्या जवळपास साडेतीनशे भाषांमध्ये उपलब्ध आहे. त्यामध्ये मराठी ही एक महत्त्वाची भाषा आहे.

Adda247
GET IT ON Google Play



प्र५. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा.

India is an ancient country of pre-historic culture and its roots can be traced bacl to ancient Hindu civilization. India is the land of mysticism, spiritualism, myths anc legends within a closed society, which has been in existence for the past 5,000 years From ancient times, society is moulded with historical, political, cultural and religiou: features. The values and norms affecting women have their roots in the past. The Vedas, epics and the puranas and other classic Sanskrit literature of ancient times are the repositories of these values and norms under which society derived its strengtl and stamina. The image and individuality of women are embedded and clearly laic down at the bottom of traditional beliefs and mythology.

This is the basis of the status of women in India. According to the ancient Hindu scriptures, women are the energy with power, i.e., shakti. She is responsible fo creation. She is "Prakruti", the nature. "Shakti is female", therefore, our creation anc all the power in the universe is based on femaleness. There would be no being withou this energy/power.

प्र६. (अ) खालील वाक्प्रचारांचा/म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

अ) सुतावरून स्वर्गाला जाणे

ब) हपापाचा माल गपापा

क) घरावर टहाळा टाकणे

ड) कोंड्याचा मांडा करणे

इ) तळीराम गार होणे.

प्र६. (ब) खाली दिलेल्या कल्पनांचा दहा वाक्यात विस्तार करा.

अ) अनुभवाविण नेत्रपाती हालवू नको रे.

ब) ओल मूळ भेदी खडकाचे अंग, अभ्यासासी सांग कार्य सिद्धी.

Adda247
GET IT ON Google Play



६. (क) खाली दिलेल्या विषयावर **वीस** वाक्यात संवाद लिहा. १०

अ) नैसर्गिक आपत्ती आणि सुरक्षितता.

६. (ड) खाली दिलेल्या शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. ५

अ) वानगी

ब) दोला

क) अर्धचंद्र

ड) ज्योत्स्ना

इ) निष्कांचन

६. (इ) खाली दिलेल्या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. ५

अ) अवरोध

ब) आत्महत्या

क) उत्पादक

ड) कृतघ्न

इ) मिताहारी

Adda247